# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**शैक्षणिक सहल – भूगोल व मराठी विभाग**

पुढारी

# राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची रायगड सफर

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

'असा हा महाराष्ट्र' अंतर्गत येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल व मराठी विभागातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्याला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यानंतर स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून इतिहास जाणून घेतला.

या चारदिवसीय शैक्षणिक सहलीत डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांना चवदार तळ्याचा लढा समजून सांगितला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात भरलेल्या प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांनी पुस्तक खरेदीही केली. किल्ले रायगडाचे बुरूज, टकमक टोक, बालेकिल्ला, सिंहासनाचा चौथरा, नगारखाना, छत्रपतींचा वाडा, शिवछत्रपतींची समाधी, जगदीश्वराचे मंदिर आदींबद्दल प्रा. डी. एम. मारकड यांनी माहिती दिली.

याशिवाय उन्हेरे येथील गरम पाण्याचे झरे, पालीचा बल्लाळेश्वर गणपती, कुलाबा आणि जंजिरा किल्ला, दिवेआगरचा ताम्रपट, बिर्ला मंदिर, हरिहरेश्वर, प्रतापगड, महाबळेश्वर, पाचगणी, वाईचा महागणपती आदी स्थळांना भेटी देऊन माहिती जाणून घेतली. या सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. मच्छिंद्र मुळुक, प्रा. योगिनी राऊत, विद्यार्थी प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर यांनी केले.



रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादनप्रसंगी राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थी.

My Gramin Edition
24 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख